**L. A. BILL No. XXXIX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

# सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९६१ चा महा. २४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (१९) चा, उप-खंड (अ-१) वगळण्यात येईल. १९६१ चा महा. २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २५अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५अ मधील, "या अधिनियमाच्या" या मजकुरानंतर, "किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २६ ऐवजी दाखल करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

यथोचित प्रदाने करण्यात येईपर्यंत सदस्यत्वाचे कोणतेही हक्क वापरावयाचे नाहीत.

"**२६.** कोणताही सदस्य, अधिनियमात, नियमांत व उपविधींमध्ये तरतूद केली असेल अशा हक्कांचा वापर करण्यास हक्कदार असेल :

परंतु, कोणत्याही सदस्यास, तो संस्थेच्या उपविधींन्वये वेळोवेळी विहित करण्यात येईल आणि विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी सदस्यत्वाबाबतची रक्कम संस्थेला चुकती करीपर्यंत किंवा संस्थेतील असा हितसंबंध संपादित करीपर्यंत, अशा हक्कांचा वापर करणार नाही :

परंतु आणखी असे की, सदस्यत्वाच्या हक्कांचा वापर करण्यासाठी भाग भांडवलातील सदस्याच्या किमान अंशदानात वाढ केल्यास, संस्था, सदस्यांला मागणीची यथोचित नोटीस देईल आणि तिचे अनुपालन करण्यासाठी वाजवी कालावधी देईल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मधील,—

(१) पोट-कलम (१अ) वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मधील, "क्रियाशील" हा शब्द वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३अ मध्ये, पोट-कलम (९) मधील, "क्रियाशील सदस्य नसेल आणि तो" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अअअ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३अअअ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(१) पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, शिखर संस्थेच्या बाबतीत, आणि अपवादात्मक परिस्थितीत, अन्य कोणत्याही संस्थेच्या बाबतीत, निबंधकास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, समितीच्या सदस्यांची संख्या पंचवीसपर्यंत वाढवता येईल : " ;

(२) विद्यमान दुसऱ्या परंतुकातील, "परंतु आणखी असे की," या मजकुराऐवजी, "परंतु तसेच," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३कअ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३कअ मधील पोट-कलम (१) मधील,—

(१) खंड (दोन-अ) वगळण्यात येईल ;

(२) खंड (चार) मधील, “त्याखाली केलेल्या नियमांखाली” या मजकुरानंतर “किंवा संस्थेच्या उपविधीखाली” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(१) पहिल्या परंतुकाआधी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

“परंतु, निबंधकास, सांसर्गिक रोग, सार्वत्रिक साथरोग, पूर, अतिवृष्टी, दुष्काळ किंवा भूकंप यांसारख्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये, वर निर्दिष्ट केलेला कालावधी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतका वाढवता येईल ;”;

(२) पहिल्या परंतुकामधील, “परंतु” या मजकुराऐवजी, “परंतु आणखी असे की” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) दुसऱ्या परंतुकामधील, “परंतु आणखी असे की” या मजकुराऐवजी, “परंतु तसेच” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७७अ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७अ मधील,—

(१) पोट-कलम (१) चे तिसरे परंतुक वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) “सहा महिन्यांच्या” या मजकुराऐवजी, “बारा महिन्यांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामधील “सहा महिन्यांपेक्षा” या मजकुराऐवजी, “बारा महिन्यांपेक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७८ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८ मधील, पोट-कलम (१) मधील,—

(१) खंड (एक) मध्ये, “सहा महिन्यांहून” या मजकुराऐवजी, “बारा महिन्यांहून” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) तिसरे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७८अ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८अ मधील, पोट-कलम (१) च्या, खंड (अ) मधील, उप-खंड (दोन) मधील, “सहा महिन्यांहून” या मजकुराऐवजी, “बारा महिन्यांहून” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७९ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९ मधील,—

(१) विद्यमान पोट-कलम (१) ला त्याचे पोट-कलम (१-१अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१-१अ) पूर्वी, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

“(१) निबंधकास, कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास या अधिनियमाच्या तरतुदींचे, त्याखाली केलेल्या नियमांचे, संस्थेच्या उप-विधींचे किंवा या अधिनियमान्वये निबंधकाने पारित केलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यासाठी कारवाई करण्याचे निदेश देता येतील ; आणि संस्थेचा अधिकारी किंवा संस्थेचे अधिकारी, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत त्या आदेशाचे अनुपालन करण्यास बांधील असतील.”;

(२) पोट-कलम (३) मध्ये, "पोट-कलम (१) " या मजकुराऐवजी "पोट-कलमे (१) व (१-१अ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८२ ऐवजी दाखल करणे.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८२ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

लेख्यांतील दोषांची दुरुस्ती.

"**८२.** (१) जर लगतपूर्ववर्ती कलमान्वये केलेल्या लेखापरीक्षेच्या निकालामध्ये संस्थेच्या कामकाजात कोणतेही दोष असल्याचे उघड केले असेल तर, संस्था, लेखापरीक्षा अहवालाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, लेखापरीक्षकाने किंवा लेखापरीक्षा करणाऱ्या व्यवसाय संस्थेने दाखवून दिलेले दोष किंवा नियमबाह्यता याबाबत निबंधकाकडे स्पष्टीकरण देईल आणि दोष दुरुस्त करण्यासाठी पावले उचलेल व नियमबाह्यता दूर करण्यासाठी उपाययोजना करील, आणि त्यावर तिने केलेल्या कारवाईचा अहवाल, निबंधकाला सादर करील आणि तो, पुढील सर्वसाधारण सभेपुढे ठेवील. निबंधक, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत असे दोष दूर करण्याच्या दृष्टीने, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कारवाई करण्यासाठी, अशा संस्थेस किंवा तिच्या अधिकाऱ्यांस निदेश देणारा आदेश देखील काढू शकेल.

(२) निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती, लेखापरीक्षा दुरुस्ती अहवालाची छाननी करील आणि त्यानुसार, असा अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत अशा अहवालाविषयी संस्थेला कळवील.

(३) संस्थेकडून संपूर्ण दुरुस्ती करण्यात येईपर्यंत, संस्थेच्या दुरुस्ती अहवालावर, त्याचे, किंवा यथास्थिति, तिचे बाबनिहाय अभिप्राय देणे आणि आपला अहवाल निबंधकाला सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षा करणाऱ्या व्यवसाय संस्थेची जबाबदारी असेल.

(४) जर संस्था, लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल निबंधकास व वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात कसूर करील तर, निबंधक आदेशाद्वारे निबंधकास व वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल सादर करणे ज्याचे कर्तव्य होते, आणि जो, वाजवी कारणांशिवाय उपरोक्त कृती करण्यात कसूर करील, त्या समितीच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला किंवा यथास्थिति, सदस्याला, अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता अशा समितीचा कोणताही पदाधिकारी किंवा सदस्य म्हणून निवडून येण्याकरिता किंवा समितीचा कोणताही पदाधिकारी किंवा सदस्य होण्याकरिता, अनर्ह ठरवू शकेल, आणि जर असा पदाधिकारी, संस्थेचा सेवक असेल तर, त्याच्यावर पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेची शास्ती लादू शकेल :

परंतु, या पोट-कलमाअन्वये असा आदेश काढण्यापूर्वी, निबंधक, संबंधित व्यक्तीला, त्याच्या विरुद्ध हाती घेण्याचे प्रस्तावित केलेल्या कारवाईविरुद्ध कारणे दाखविण्याची वाजवी संधी देईल किंवा देण्याची व्यवस्था करील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(१) "निबंधकाने मुदतवाढ केली नसेल तर" या मजकुराऐवजी, "निबंधकाने किंवा शासनाने मुदतवाढ दिली नसेल तर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु, निबंधक एका वेळी एक वर्षापेक्षा अधिक आणि एकूण चार वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी कोणतीही मुदतवाढ देणार नाही :

परंतु आणखी असे की, जर दहा वर्षांपलिकडे आणखी मुदतवाढ देण्याची आवश्यकता असेल तर, निबंधक, अशा मुदतवाढीकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठवील. शासन, एकावेळी एक वर्षापेक्षा

अधिक आणि एकूण पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी मुदतवाढ देऊ शकेल :

परंतु तसेच, उपरोक्त दिनांकापासून पंधरा वर्षांची मुदत संपल्यानंतर, तात्काळ, परिसमापनाची कार्यवाही समाप्त करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि निबंधक, परिसमापन कार्यवाही समाप्त करण्याचा आदेश पारित करील :" ;

(३) दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४४-५अ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४४-५अ मध्ये स्पष्टीकरणापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, वेतनदार सहकारी पतसंस्थेला, त्यांच्या सदस्यांच्या, सेवानिवृत्तीनंतर, त्यांना नाममात्र सदस्य म्हणून त्यांचे नाव नोंदवून, त्यांच्याकडून स्वेच्छेने ठेवी स्वीकारता येतील. ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४६ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४६ मधील, खंड (ल-१) वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४७ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४७ मधील, खंड (ल-१) वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५२-अ ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५२-अ मधील, पोट-कलम (१) मध्ये, "तीन दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी, "तीन कार्य दिवसांच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५४ मधील, पोट-कलम (२अ) मध्ये,—

(क) "किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) "विचारार्थ स्वीकारला जाणार नाही :" या मजकुराऐवजी, "विचारार्थ स्वीकारला जाणार नाही. जर पुनरीक्षण अर्ज मान्य केला असेल तर, पुनरीक्षण प्राधिकारी, अशा रीतीने जमा केलेली रक्कम अर्जदारास परत करण्याचा संस्थेला निदेश देणारा आदेश पारित करू शकेल :" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५४ब ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५४ब मधील,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, "७८अ, पोट-कलमे (१), (१अ)" या मजकूराऐवजी, "७८अ, पोट-कलमे (१), (१-१अ), (१अ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, "(१९) (अ), (अ-१), (ब)" या मजकूराऐवजी, "(१९) (अ), (ब)", हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५७ ची सुधारणा.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५७ मधील, दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

संविधान (सत्याण्णावी सुधारणा) अधिनियम, २०११ द्वारे भारताच्या संविधानामध्ये सहकारी संस्थांशी संबंधित असणारा नवीन भाग नऊ-ख समाविष्ट करण्यात आला आहे. उक्त भाग नऊ-ख च्या सांविधानिक तरतुदींशी अनुरुप, उक्त अधिनियमामध्ये तरतुदी करण्याकरिता म्हणून, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यामध्ये विविध सुधारणा केल्या आहेत.

२. गुजरात उच्च न्यायालयाने, राजेंद्र शहा विरुद्ध भारताचे संघराज्य (२०१२ चा सीडब्ल्यूपीपीआयएल १६६) या प्रकरणी, भाग नऊ-ख चा समावेश करणारा उक्त संविधान सुधारणा अधिनियम घटनेविरोधी असल्याचे घोषित केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने (२०१४ चे दिवाणी अपिल क्रमांक ९१०८-९१०९) या प्रकरणी गुजरात उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय, तो भारताच्या संविधानाचा भाग नऊ-ख संपूर्णपणे रद्दबातल करीत आहे या मर्यादेखेरीज, कायम केला आहे. उक्त न्यायनिर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे घोषित केले आहे की, भारताच्या संविधानाचा भाग नऊ-ख, जेथवर तो, भारताच्या विविध राज्यांमधील व संघराज्यांमधील बहुराज्यीय सहकारी संस्थांशी संबंधित आहे तेथवरच केवळ अंमलात असेल.

संस्थेच्या सदस्यांच्या हितार्थ आणि सहकारी चळवळीच्या सुरळीत कामकाजाकरिता उक्त अधिनियमात विवक्षित सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते.

३. उक्त अधिनियमाच्या प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) "क्रियाशील सदस्य" या संज्ञेची व्याख्या व त्याच्याशी संबंधित असणाऱ्या तरतुदी वगळण्याच्या दृष्टीने, कलमे २(१९), २६, २७ व ७३अ ची सुधारणा करणे ;

(२) जो सदस्य, सदस्य असण्याचे समाप्त झाला आहे किंवा जो सदस्य उक्त अधिनियमाखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये निरर्ह ठरला आहे अशा सदस्याचे नाव, त्यांच्या सदस्य नोंदवहीमधून काढून टाकणे संस्थेला शक्य व्हावे याकरिता कलम २५अ ची सुधारणा करणे ;

(३) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, शिखर संस्थांच्या, किंवा यथास्थिति, अन्य कोणत्याही संस्थांच्या समितीमध्ये सर्व महसुली विभागांना, जिल्ह्यांना किंवा तालुक्यांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने, शिखर संस्थेच्या आणि अपवादात्मक परिस्थितीत, अन्य कोणत्याही संस्थेच्या समितीची सदस्य संख्या, पंचवीसपर्यंत वाढविणे निबंधकास शक्य व्हावे यासाठी कलम ७३ अअअ ची सुधारणा करणे ;

(४) संस्थेच्या उप-विधींनुसार जो निरर्ह झाला आहे अशा सदस्यास निरर्ह ठरविणे संस्थेस शक्य व्हावे यासाठी कलम ७३ कअ ची सुधारणा करणे ;

(५) निबंधकास, सांसर्गिक रोग, सार्वत्रिक साथरोग, इत्यादींसारख्या अपवादात्मक परिस्थितीत, वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी वाढविता येईल अशी तरतूद करण्यासाठी कलम ७५ मध्ये सुधारणा करणे ;

(६) कलम ७८ व ७८अ अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकांना किंवा प्रशासकांच्या समितीला त्यांची प्रशासकीय कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांचा कालावधी सहा महिन्यांपासून बारा महिन्यांपर्यंत वाढविण्यासाठी कलमे ७८ व ७८अ यामध्ये सुधारणा करणे ;

(७) उक्त अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा उप-विधींच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी कोणत्याही सहकारी संस्थेस किंवा तिच्या वर्गास निदेश देणे निबंधकाला शक्य व्हावे याकरिता कलम ७९ ची सुधारणा करणे ;

(८) लेखापरीक्षा दुरुस्ती अहवालावर कार्यवाही करणे आणि अनुपालन न केल्याच्या प्रकरणी पुढील कार्यवाही करणे निबंधकास सुकर व्हावे यासाठी कलम ८२ ची सुधारणा करणे ;

(९) परिसमापनाच्या जटील प्रक्रियेमुळे काही सहकारी संस्था यांचे परिसमापनाचे काम दहा वर्षांमध्ये पूर्ण होऊ शकत नाही असे निदर्शनास आले असल्याने, संस्थेच्या परिसमापनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचा कालावधी, दहा वर्षांपासून पंधरा वर्षे इतका वाढविणे राज्य शासनास शक्य व्हावे यासाठी कलम १०९ ची सुधारणा करणे ;

(१०) निवृत्त होणाऱ्या सदस्यांना ठेवी परत केल्यामुळे झालेल्या रोखतेच्या टंचाईवर मात करण्यासाठी निवृत्त झालेल्या सदस्यांना, नाममात्र सदस्य करून, त्यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्याकडून ठेवी घेण्यासाठी वेतनदार सहकारी पत संस्थेला अनुमती देण्यासाठी कलम १४४-५अ ची सुधारणा करणे ;

(११) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींपासून किंवा त्याखाली केलेल्या नियमांपासून कोणत्याही संस्थेस किंवा संस्थेच्या वर्गास सूट देण्यासाठी राज्य शासनाचे अधिकार पुनःस्थापित करण्यासाठी कलम १५७ ची सुधारणा करणे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २३ डिसेंबर, २०२१.

**बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ४**.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याचे कलम २६ बदली दाखल करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, उक्त अधिनियम, नियम व उपविधी खालील सदस्याच्या हक्कांचा वापर करणे त्यास शक्य व्हावे म्हणून, सदस्यत्वाबाबत सदस्याकडून संस्थेला द्यावयाची रक्कम किंवा सदस्याने संस्थेत संपादित करावचाया हितसंबंध, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ९**.— उक्त अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये सुधारणा करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, निबंधकास, सांसर्गिक रोग, सार्वत्रिक साथरोग, पूर, अतिवृष्टी, दुष्काळ किंवा भूकंप यांसारख्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये, वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचा कालावधी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल, इतका वाढविण्याचा अधिकार, निबंधकाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

**सन २०२१ चे वि. स. विधेयक क्रमांक ३९.— महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ — याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील उतारे.)**

**(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.)**

**१.** ** ** ** व्याख्या.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, या अधिनियमात,—

(१) व (१८) ** ** **

(१९) (अ) ** ** **

(अ-१) " क्रियाशील सदस्य " याचा अर्थ, जो संस्थेच्या कारभारात भाग घेतो आणि उपविधीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा संस्थेच्या सेवांचा किंवा साधनांचा किमान मर्यादेत वापर करतो असा सदस्य, असा आहे ;

(ब) ते (क) ** ** **

(१९) (अ) ** ** **

(२०) ते (३१) ** ** **

**३.** ते **२५.** ** ** **

२५अ. जी व्यक्ती सदस्य असण्याचे बंद झाले असेल अथवा या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये किंवा त्यानुसार सदस्य असण्यास किंवा चालू राहण्यास निरर्ह ठरली असेल, अशा व्यक्तींचे नाव संस्थेची समिती आपल्या सदस्य नोंदवहीतून काढून टाकील : सदस्य नोंदवहीतून सदस्यांची नावे काढून टाकणे.

परंतु, जर संस्थेने या कलमाच्या गरजा पूर्ण केल्या नाहीत तर, निबंधक अशा संस्थेला अशा व्यक्तीचे नाव काढून टाकण्याचा निदेश देईल आणि अशा निदेशाचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

**२६.** (१) कोणताही सदस्य, अधिनियमात, नियमांत आणि उपविधींमध्ये तरतूद केली असेल अशा हक्कांचा वापर करण्यास हक्कदार असेल : सदस्यांचे हक्क व कर्तव्ये

परंतु, कोणत्याही सदस्यास, त्याने सदस्यत्वाबाबत वेळोवेळी संस्थेच्या उपविधींन्वये विहित करण्यात येईल आणि विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम संस्थेला चुकती करीपर्यंत किंवा संस्थेत असा हितसंबंध संपादन करीपर्यंत, अशा हक्कांचा वापर करणार नाही :

परंतु आणखी असे की, सदस्यत्वाच्या हक्काचा वापर करण्यासाठी भाग भांडवलातील सदस्याच्या किमान अंशदानात वाढ केल्यास, संस्था, सदस्यांना यथोचित मागणीची नोटीस देईल आणि अनुपालन करण्यासाठी वाजवी कालावधी देईल.

(२) संस्थेच्या प्रत्येक सदस्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(अ) लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत सर्व सदस्य मंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणे :

परंतु, या खंडातील कोणतीही गोष्ट, ज्या सदस्याची अनुपस्थिती सर्वसदस्य मंडळाने क्षमापित केलेली असेल अशा कोणत्याही सदस्याच्या संबंधात लागू होणार नाही.

(ब) संस्थेच्या उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणे :

परंतु जो सदस्य वरीलप्रमाणे लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत अधिमंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, लागोपाठच्या पाच वर्षांच्या कालावधीत

किमान एकदा सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही, अशा कोणत्याही सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा संस्था एखाद्या सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करील तेव्हा, ती संस्था, वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित सदस्याला अशा वर्गीकरणाबाबत विहित रीतीने कळवील :

परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षांमध्ये, जो अक्रियाशील सदस्य अधिमंडळाच्या निदान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही असा कोणताही अक्रियाशील सदस्य कलम ३५ अन्वये काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल :

परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केलेल्या सदस्याने, या पोट-कलमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे पात्रता निकषांची पूर्तता केल्यावर, तो क्रियाशील सदस्य म्हणून त्याचे पुनःवर्गीकरण केले जाण्यास हक्कदार होईल :

परंतु असेही की, एखादा सदस्य क्रियाशील किंवा अक्रियाशील सदस्य असण्याबाबत वाद उद्‌भवल्यास, असे वर्गीकरण केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे त्याबाबत अपील करण्यात येईल :

परंतु असेही की, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१३ याच्या प्रारंभाच्या लगतनंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत, त्या संस्थेचे सर्व विद्यमान सदस्य, त्यांना मतदान करण्यासाठी अन्यथा अपात्र घोषित केले नसेल तर, मतदान करण्यासाठी पात्र ठरतील.

सदस्यांचे मतदानाचे अधिकार.

**२७.** (१) ** ** **

(१अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जो क्रियाशील सदस्य त्यानंतर संस्थेच्या कामकाजात सहभागी होण्यात आणि वेळोवेळी उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किमान मर्यादेपर्यंत सेवांचा वापर करण्यात कसूर करील तो सदस्य क्रियाशील सदस्य असण्याचे बंद होईल आणि तो मतदान करण्यास हक्कदार असणार नाही.

" परंतु, या पोट-कलमाची तरतूद, ३१ मार्च २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यावयाच्या संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत, लागू असणार नाही ".

(२) ** ** **

(३) ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असेल त्या संस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्या वतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही एका क्रियाशील सदस्याची नेमणूक करता येईल व त्याप्रमाणे अशा सदस्यास आपल्या संस्थेच्या वतीने मत देण्याचा अधिकार राहील :

परंतु, संघीय संस्थेच्या कोणत्याही नवीन सदस्य संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग अशा संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच फक्त ती त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्यास पात्र असेलः

परंतु, आणखी असे की, कलम ७३ ब अन्वये राखीव जागेसाठी निवडणूक असेल त्या बाबतीत कोणाही व्यक्तीला एकापेक्षा अधिक मत असणार नाही.

(३अ) ** ** **

(४) ते (११) ** ** **

**२८.** ते **७३.** ** ** **

**७३. एक-ड.** ** ** **

**७३अ.** (१) ते (८) ** ** **

(९) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत जर कोणताही सदस्य क्रियाशील सदस्य नसेल आणि तो अशा अधिसूचनेत घालून देण्यात येतील अशा संस्थेशी असलेल्या त्याच्या आर्थिक व्यवहारासंबंधीच्या किमान शर्ती पूर्ण करीत नसेल तर, असा कोणताही सदस्य, पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास, स्वीकृत किंवा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही.

विवक्षित प्रवर्गाच्या संस्थांचे एकाचवेळी पदनिर्देशित अधिकारी होण्याकरिता अनर्हता.

**७३.अअअ.** (१) उपविधीमध्ये तरतूद करण्यात येईल इतक्या सदस्य संख्येचा समितीत अंतर्भाव असेल ;

समितीची रचना करणे.

परंतु, समितीच्या सदस्यांची कमाल संख्या एकवीसपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु, आणखी असे की, बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ याच्या तरतुदी बँक व्यवसाय करणाऱ्या सर्व संस्थांना लागू होतील.

(२) ते (५) ** ** **

**७३ ब.** आणि **७३-क** ** ** **

**७३-कअ.** (अ-१) ** ** **

(१) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींना किंवा समितीच्या सदस्यत्वविषयक निरर्हतेसंबंधी त्याखाली केलेल्या नियमांना बाध न येता, कोणतीही व्यक्ती पुढील बाबतीत समितीचा सदस्य म्हणून नेमणूक होण्यास, नामनिर्दिष्ट होण्यास, निवडून येण्यास, स्वीकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही, जर,—

समितीची आणि तिच्या सदस्यांची निरर्हता.

(एक) ** ** **

(दोन) ** ** **

(दोन-अ) कलम २६च्या पोट-कलम (२) अन्वये, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात आले असेल ; किंवा

(तीन) ** ** **

(चार) जर त्या व्यक्तीवर या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमांखाली कोणतीही निरर्हता ओढवली असेल तर ; किंवा

(पाच) ते (नऊ) ** ** **

(२) ते (४) ** ** **

**७३-कब. ७३आय.** ** ** **

**७४.** ** ** **

**७५.** (१) प्रत्येक संस्था वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून चार महिन्याच्या कालावधीत आपले लेखापरीक्षण करून घेईल आणि अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे तिचे कामकाज चालविण्यासाठी, वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावील :

अधिमंडळाची वार्षिक बैठक.

“ परंतु २०१९ -२०२० या वित्तीय वर्षाकरिता, संस्थेस, तिच्या लेखा पुस्तकांची लेखापरीक्षा, तिच्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून नऊ महिन्यांच्या आत, करून घेता येईल आणि तिची वार्षिक सर्वसाधारण बैठक, तिच्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून बारा महिन्यांच्या आत, बोलाविता येईल.”;

परंतु आणखी असे की, संस्थेने अशी बैठक बोलाविली नसेल याबाबतीत निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास विहित केलेल्या रितीने अशी बैठक बोलविता येईल आणि अशी बैठक ही संस्थेने योग्य रितीने बोलाविलेली सर्वसाधारण बैठक असल्याचे समजले जाईल ; आणि अशी बैठक बोलविण्यासाठी आलेला खर्च संस्थेच्या निधीतून किंवा निबंधकाच्या मते सर्वसाधारण बैठक बोलविण्यास नकार दिल्याबद्दल किंवा कसूर केल्याबद्दल जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती जबाबदार असेल/असतील ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती देतील, असा आदेश निबंधकास देता येईल.

(२) ते (६) ** ** **

**७६.** व **७७.** ** ** **

समितीच्या सदस्याची नियुक्ती नवीन समिती किंवा समितीची घटना करीत असतेवेळी कोणताही सदस्य निवडून न येणे व नवीन समितीने पदभार न स्वीकारणे यावेळी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती.

**७७अ.** (१) जर निबंधकाची खात्री होईल की,—

(१-क) तात्पुरत्या समितीने, कलम ७३ च्या पोट-कलम (१-क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे तिची मुदत संपण्यापूर्वी पहिल्या समितीची रचना करण्यासाठी निवडणूक घेण्याकरिता आवश्यक व्यवस्था करण्यात कसूर केलेली आहे ;

(अ) कोणत्याही संस्थेच्या समितीची प्रथम रचना करण्यात आली, त्यावेळी समितीचे सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे ;

(ब) कोणत्याही संस्थेच्या समितीचा किंवा तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी संपला म्हणून किंवा इतर कोणत्याही कारणासाठी निवडणूक घेण्यात आली व त्यावेळी रिक्त जागा भरण्यासाठी आवश्यक असलेले सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे ;

(ब-१) समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे ;

(क) कोणत्याही समितीस पदग्रहण करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे ;

(ड) कोणत्याही नवीन समितीने, विद्यमान समितीचा पदावधी संपण्याच्या दिनांकास पदग्रहण करण्यात कसूर केली आहे ; किंवा

(फ) संस्थेतील व्यक्तीचे एकापेक्षा अधिक गट समिती सदस्य म्हणून निवडून आल्याचा दावा करीत असतील आणि त्या संबंधातील कार्यवाही सहकारी न्यायालयात दाखल करण्यात आली असेल ; तर निबंधकास स्वाधिकारे किंवा संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा सदस्याच्या अर्जावरून; आदेशाद्वारे,—

(एक) रिक्त जागा भरण्यासाठी संस्थेच्या कोणत्याही सदस्याला किंवा सदस्यांना समितीचा सदस्य किंवा समितीचे सदस्य म्हणून नेमता येईल.

(दोन) नवीन समिती पदग्रहण करीपर्यंत संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी संस्थेचे तीनपेक्षा अधिक सदस्य मिळून बनलेली समिती किंवा [एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी] नेमता येतील, प्रशासक हे संस्थेचे सदस्य असणे आवश्यक असणार नाही.

परंतु, असा आदेश काढण्यापूर्वी, निबंधक संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सूचना फलकावर प्रस्तावित आदेशाच्या संबंधातील हरकती व सूचना नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत मागविण्यासाठी नोटीस लावील आणि त्या कालावधीत त्याच्याकडे आलेल्या सर्व हरकती व सूचना यांवर विचार करील:

परंतु आणखी असे की, त्वरित कार्यवाही करणे आवश्यक आहे किंवा अशी नोटीस प्रसिद्ध करणे, वाजवीरीत्या व्यवहार्य नाही, याबद्दल निबंधकाची खात्री होईल, अशा कोणत्याही प्रकरणी अशी नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक असणार नाही.

“ परंतु तसेच की, संस्थेचा कोणताही सदस्य किंवा कोणतेही सदस्य अशा समितीवर काम करण्यास इच्छुक नसतील तर संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी निबंधकाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, संस्थेचा सदस्य नसेल अशा एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकाऱ्यांची नेमणूक करणे हे निबंधकासाठी कायदेशीर असेल.’’

(२) ** ** **

(३) याप्रमाणे नेमण्यात आलेली समिती किंवा प्राधिकृत अधिकारी संस्थेचे व्यवस्थापन हाती घेतल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीकरिता अधिकारपद धारण करील आणि उक्त कालावधीत नवीन समितीची रचना करण्याच्या दृष्टीने आणि नवीन समितीला यामध्ये कायदेशीररीत्या निवडून येण्यासाठी न्यायालय निर्धारित करील, अशा पोट-कलम (१), खंड (फ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नवीन समितीचा अंतर्भाव होतो-अधिकारपद ग्रहण करता येण्याच्या दृष्टीने आवश्यक ती व्यवस्था करील :

‘ परंतु, कोणत्याही परिस्थितीत, समितीचा किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचा पदावधी हा त्यांच्या पद धारण केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही’.

(४) व (५) ** ** **

समितीस काम करण्यापासून रोखून ठेवण्याचा अधिकार.

**७८.** (१) निबंधकाच्या मते, समिती ही तिची कर्तव्ये पार पाडण्यात सतत कसूर करीत असेल किंवा तिची कर्तव्ये पार पाडण्यात निष्काळजीपणा करीत असेल किंवा अन्यथा तिची कामे उचितरीत्या आणि साक्षेपाने पार पाडीत नसेल, किंवा समितीच्या सदस्यांचा राजीनामा, निरर्हता यांमुळे किंवा अन्यथा समितीच्या रचनेत किंवा कार्यात दोष असेल तर, निबंधक, नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, समितीला, कारणे लेखी सादर करण्याची कोणतीही असल्यास, संधी दिल्यानंतर आणि म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानतर व ती संस्था जिच्याशी संलग्न असेल, त्या संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर, नोटीशीमध्ये नमूद केलेले आरोप सकृतदर्शनी आढळून येत आहेत, परंतु त्यावर उपाययोजना करणे शक्य आहे या निष्कर्षाप्रत आला असेल तर, तो आदेशाद्वारे,—

(एक) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, सहा महिन्यांहून अधिक नसेल अशा तात्पुरत्या कालावधीसाठी अशा समितीला काम कराण्यापासून रोखून ठेवू शकेल, आणि

(दोन) संस्थेचा कारभार चालवण्यासाठी, त्या समितीच्या जागी प्रशासक किंवा संस्थेच्या तीन किंवा अधिक सदस्यांचा जे अशा प्रकारे रोखून ठेवलेल्या समितीचे सदस्य असणार नाहीत-समावेश असलेली प्रशासकांची समिती नेमू शकेल किंवा प्रशासक किंवा प्रशासकांची-जे संस्थेचे सदस्य असण्याची आवश्यकता नाही-समिती नेमू शकेल ;

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट जेथे शासनाने भाग धारण केले नसतील किंवा कोणत्याही रोख रकमेच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे कर्ज किंवा वित्तीय सहाय्य नसेल किंवा शासनाने कोणतीही हमी दिली नसेल तर, अशा संस्थेला लागू होणार नाही ;

परंतु आणखी असे की, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँक विनियम अधिनियम, १९४९ याच्या तरतुदीसुद्धा लागू होतील ;

परंतु तसेच की, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत या खंडाच्या तरतुदी जणू काही “ सहा महिन्यांहून ” या मजकुराऐवजी “ वर्षाहून ” हा मजकूर दाखल करण्यात आला आहे असे मानून, लागू होतील ;

परंतु तसेच की, या कलमाखाली काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वीसुद्धा, निबंधकाला त्याच्या स्वेच्छाधिकाराने समिती किंवा तिचा कोणताही सदस्य किंवा नेमलेला प्रशासक, बदलण्याचा अधिकार असेल ;

परंतु तसेच की, अशी संघीय संस्था, सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत निबंधकाला आपले मत कळविल, असे करण्यास कसूर केल्यास अशा संघीय संस्थेला काम करण्यापासून रोखून ठेवण्याबाबतच्या आदेशाबद्दल कोणतीही हरकत नाही असे गृहित धरण्यात येईल आणि निबंधकाला त्यानुसार आणखी कार्यवाही सुरू करण्याचे स्वातंत्र्य असेल.

(२) ते (६) ** ** **

समितीस निष्प्रभावित करण्याचा किंवा तिच्या सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार.

**'७८अ.** (१) निबंधकाच्या मते, समितीने किंवा अशा समितीच्या कोणत्याही सदस्याने, संस्थेच्या किंवा तिच्या सदस्यांच्या हितास बाधक होईल अशी कोणतीही कृती केली असेल किंवा राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निवडणुका घेण्यात कसूर केली असेल किंवा जेथे समिती किंवा अशा समितीच्या कोणताही सदस्य तिची किंवा त्याची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत असेल किंवा ती पार पाडणे थांबवले असेल, अशी परिस्थिती उद्‌भवली असेल आणि संस्थेचे कामकाज ठप्प झाले असेल किंवा ठप्प होण्याची शक्यता असेल, अथवा जेथे गंभीर वित्तिय नियमबाह्य बाबी किंवा अफरातफरी उघडकीस आल्या असतील किंवा अशा आशयाचे न्यायिक निदेश देण्यात आलेले असतील किंवा जेथे सतत गणपूर्ती होत नसेल तेथे किंवा निबंधकाच्या मते, कलम ७८ च्या पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कारणांवर सुधारात्मक उपाययोजना केल्या नसतील किंवा त्याचे अनुपालन केले नसेल तेथे किंवा जेथे अशा समितीचा कोणताही सदस्य, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखालील समितीचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह झाला असेल तेथे, निबंधक, समितीला किंवा यथास्थिती, सदस्याला तिच्या किंवा त्याच्या कोणत्याही आक्षेपांविषयी, कलम ७८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लेखी निवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याबाबत म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, व ती संस्था जिच्याशी संलग्न असेल त्या संघीय संस्थेशी विचार विनिमय केल्यानंतर नोटिशीमध्ये नमूद केलेले दोषारोप सिद्ध झाले आहेत आणि हा अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदींअन्वये संस्थेचे प्रशासन चालवले जाऊ शकत नाही या निष्कर्षाप्रत आला असेल तर, त्याबाबतची कारणे नमूद करून तो आदेशाद्वारे,—

(अ) (एक) समितीस निष्प्रभावित करील, आणि

(दोन) सहा महिन्यांहून अधिक असणार नाही एवढ्या कालावधीसाठी संस्थेचा कारभार चालविण्यासाठी त्या समितीच्या जागी अशाप्रकारे निष्प्रभावित केलेल्या समितीचे सदस्य वगळून तीन किंवा अधिक सदस्यांचा समावेश असलेली समिती किंवा प्रशासक किंवा प्रशासकांची समिती, जे संस्थेचे सभासद असणे आवश्यक नसेल, यांची नियुक्ती करील.

परंतु, या पोट-कलमान्वये काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वीसुद्धा निबंधकाला, समिती किंवा तिचा कोणताही सदस्य अथवा नेमलेला प्रशासक किंवा नेमलेले प्रशासक स्वेच्छाधिकाराने बदलण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, अशी संघीय संस्था सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, असे करण्यास कसूर केल्यास अशा संघीय संस्थेला अशी समिती निष्प्रभावित करण्याबाबतच्या किंवा सदस्यांना काढून टाकण्याच्या आदेशाबद्दल कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि निबंधकाला त्यानुसार आणखी कार्यवाही सुरू करण्याचे स्वातंत्र्य असेल.

परंतु तसेच की, बँकींग व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँकींग विनियमन अधिनियम, १९४९ च्या तरतुदीसुद्धा लागू होतील आणि अशा संस्थेची समिती, एकावर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी निष्प्रभावित केली जाणार नाही.

परंतु तसेच की, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट जेथे शासनाने भाग धारण केलेले नसतील किंवा रोख रकमेच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे कर्ज किंवा वित्तिय सहाय्य केलेले नसेल किंवा शासनाने कोणतीही हमी दिली नसेल तर, अशा संस्थेला लागू होणार नाही ;

(ब) सदस्याला काढून टाकू शकेल ;

परंतु, अशाप्रकारे ज्याला काढून टाकण्यात आलेले असेल तो सदस्य त्याला ज्या दिनांकास काढून टाकण्यात आले असेल त्या दिनांकापासून समितीच्या पुढच्या एका कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत कोणत्याही संस्थेच्या, कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही.

परंतु आणखी असे की, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँकींग विनियमन अधिनियम, १९४९ याच्या तरतुदीसुद्धा लागू होतील.

(२) ** ** **

**७९** ते **८१** ** ** **

**८२.** लगतपूर्ववर्ती कलमान्वये केलेल्या लेखापरीक्षेवरून संस्थेच्या कामकाजात कोणतेही दोष असल्याचे उघडकीस आले तर, संस्थेने, लेखापरीक्षेच्या अहवालाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत लेखापरीक्षकाने निदर्शनास आणलेले दोष किंवा नियमबाह्यता याबाबत निबंधकाकडे स्पष्टीकरण देईल आणि दोष दुरुस्त करण्यासाठी किंवा नियमबाह्य दूर करण्यासाठी उपाययोजना करील आणि त्यावर तिने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल निबंधकाला सादर करील आणि तो, अधिमंडळाच्या पुढच्या बैठकीसमोरदेखील ठेवील, तसेच निबंधकास आदेशाद्वारे, असे दोष सुधारण्यासाठी अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी उपाययोजना त्यात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत करण्याविषयी अशा संस्थेस किंवा तिच्या पदाधिकाऱ्यांस निदेश देता येईल, लेख्यांतील दोषांची दुरुस्ती.

"जी समिती, निबंधकाला आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल सादर करण्यात कसूर करील तर, त्या समितीच्या सर्व सदस्यांनी, कलम १४६ खालील अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ते कलम १४७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र ठरतील. संबंधित संस्था ही संघीय संस्थेची सदस्य असेल त्याबाबतीत, शास्ती लादण्याचे आदेश, संबंधित अधिसूचित संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर काढण्यात येईलः

परंतु, निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती, त्यानुसार लेखापरीक्षा दुरुस्ती अहवालाची छाननी करील आणि त्या विषयी, दुरुस्ती अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांत अशा अहवालाविषयी संस्थेला कळवील :

परंतु आणखी असे की, संस्था संपूर्ण दुरुस्ती करीपर्यंत, संस्थेच्या दुरुस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला आपला अहवाल सादर करणे ही संबंधित लेखापरीक्षकाची जबाबदारी असेल :

परंतु, तसेच की, अशी संधीय संस्था, सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत, निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, प्रस्तावित कारवाईस अशा संघीय संस्थेचा कोणताही आक्षेप नाही असे गृहित धरण्यात येईल आणि त्यानुसार निबंधकास पुढील कारवाई सुरू करण्याची मोकळीक राहील."

**८३** ते **१०८** ** ** **

**१०९.** (१) निबंधकाने मुदतवाढ केली नसेल तर, कलम १०३, पोट-कलम (२) खाली ज्यासाठी संस्था हक्कदार असेल किंवा हक्कदार असल्याचे दिसून येईल, ती सर्व मालमत्ता चीजवस्तू आणि कारवाईयोग्य दावे आणि संस्थेच्या कामकाजाशी संबंधित असलेली पुस्तके, अभिलेख आणि इतर दस्तऐवज परिसमापक आपल्या अभिरक्षेत आणि नियंत्रणाखाली ठेवील, त्या दिनांकापासून सहा वर्षाच्या आत व्यवहार्य होईल तितक्या लवकर संस्थेच्या समापनाची कार्यवाही बंद करण्यात येईल. परिसमापनाची कार्यवाही बंद करणे.

परंतु, निबंधक एकाच वेळी एक वर्षाहून आणि एकूण चार वर्षाहून अधिक होईल इतकी मुदतवाढ मंजूर करणार नाही आणि पूर्वोक्त दिनांकापासून दहा वर्षाची मुदत संपल्यावर लगेच परिसमापनाची कार्यवाही समाप्त झाली आहे, असे समजून तो परिसमापनाची कार्यवाही समाप्त करण्याविषयी आदेश देईल.

"परंतु आणखी असे की, जर दहा वर्षांच्या अखेरीस परिसमापनाच्या कार्यवाहीच्या समाप्तीमुळे निबंधक या निष्कर्षाप्रत येईल की, परिसमापक कलम १०५ खालील परिसमापनाचे काम त्याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे पूर्ण करू शकणार नाही तर, तो परिसमापक अहवाल सादर करण्यास फर्मावील. अहवाल प्राप्त झाल्यानंतर, अजूनही मत्ता, मालमत्ता यांची विक्री करून रोख किंमत वसूल करावयाची राहून गेली असल्याबाबत निबंधकाची खात्री पटली असेल तर, तो, ते संपूर्ण काम पूर्ण करण्याचे आणि समापनाच्या प्रयोजनासाठीच फक्त ती कार्ये पार पाडण्याचे आणि परिसमापकाकडून अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून गणना केलेल्या एका वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीच्या आत आपला अहवाल सादर करील असे परिसमापकाला निदेश देईल."

[**स्पष्टीकरण.**—महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८५ च्या प्रारंभास जी संस्था समापनाखाली असेल, त्या संस्थेच्या बाबतीतील सहा वर्षाचा कालावधी परिसमापक ज्या दिनांकास उपरोक्तप्रमाणे ताबा घेईल किंवा नियंत्रण ठेवील त्या दिनांकापासून सुरू झाल्याचे समजण्यात येईल.]

(२) व (३) ** ** **

**११०.** ते **१४४.** ** ** **

**१४४-एक अ.** ** ** **

**१४४-२अ.** ते **१४४-४अ** ** ** **

सदस्य नसलेल्या व्यक्तींकडून ठेवी स्वीकारण्यास प्रतिबंध असणे.

**१४४-५अ.** कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही बिगर कृषि सहकारी पत संस्था, तिचा सदस्य नसेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून ठेव स्वीकारणार नाही. उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर कोणत्याही संस्थेने तिचा सदस्य नसलेल्या व्यक्तींकडून ठेवी स्वीकारल्या असतील तर, ती उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ च्या प्रारंभापासून दोन वर्षाच्या आत, एकतर त्यांची सदस्य म्हणून नोंदणी करील किंवा सदस्य नसलेल्या सर्व व्यक्तींच्या ठेवी परत करील.

**स्पष्टीकरण.**——या कलमाच्या प्रयोजनार्थ, " सदस्य " यामध्ये नाममात्र सदस्य अंतर्भूत नाही.

**१४४-६अ** ते **१४४-३१अ.** ** ** **

**१४५.** ** ** **

**१४६.** पुढील गोष्टी या अधिनियमान्वये अपराध ठरतील.

अपराध.

(अ) ते (ल) ** ** **

(ल-१) कलम ८२ अनुसार समितीने, निबंधकाला आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल सादर करण्यात कसूर करणे ; किंवा ".

(म) ते (क्यू) ** ** **

कलम १४६ खालील अपराधांबद्दल शिक्षा.

**१४७.** प्रत्येक संस्था, संस्थेचा प्रत्येक अधिकारी किंवा माजी अधिकारी, सदस्य किंवा माजी सदस्य, कर्मचारी किंवा माजी कर्मचारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती कलम १४६ खाली अपराध करील, तर अपराध सिद्धीनंतर तिला तो अपराध—

(अ) ते (ल) ** ** **

(ल-१) त्या कलमाच्या खंड (ल-१) खालील अपराध असल्यास, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;";

(म) ते (क्यू) ** ** **

**१४८.** ते **१५२.** ** ** **

निवडणुकीत नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्यास, त्याविरूद्ध अपील करणे.

**१५२अ.** (१) या अधिनियमात अथवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा उपविधी यात काहीही अंतर्भूत असले तरी, अन्य कोणत्याही संस्थेच्या समितीच्या निवडणुकीत उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत निबंधकांकडे अपिल दाखल करता येईल. निबंधक, असे अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत असे अपील निकालात काढील आणि या अपिलामध्ये निबंधकाने दिलेला निर्णय अंतिम असेल व अशा निर्णयावर आणखी अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करता येणार नाही. संस्थेच्या बाबतीत, असे अपील राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे दाखल करण्यात येईल आणि असा अधिकारी, ते अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत निकालात काढील आणि या अपिलामध्ये अशा अधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(२) ** ** **

**१५३.** ** ** **

**१५४.** (१) व (२) ** ** **

राज्य शासनाचे आणि निबंधकाचे पुनरीक्षणविषयक अधिकार.

(२अ) अर्जदाराने, एकूण वसुलीयोग्य देय रकमेच्या पन्नास टक्के इतकी रक्कम संबंधित संस्थेकडे जमा केल्याखेरीज, कलम १०१ किंवा १५४-ब-२९ अन्वये निबंधकाने दिलेल्या वसुली प्रमाणपत्राच्या किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या पुनरीक्षणासाठीचा कोणताही अर्ज, विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

परंतु, जेथे अशा पुनरीक्षणाच्या बाबतीत पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने देय वसुलीला स्थगिती दिली असेल तेथे प्राधिकारी व्यवहार्य असेल तितपत असा पुनरीक्षण अर्ज शक्य तितक्या लवकर परंतु पहिल्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यापेक्षा उशिरा नसेल इतक्या कालावधीत निकालात काढील.

(३) ते (४) ** ** **

**१५४-अ** ** ** **

गृहनिर्माण संस्थांना या अधिनियमाच्या तरतुदींची प्रयुक्ती आणि अप्रयुक्ती.

**१५४ब.** (१) या अधिनियमाच्या पुढील तरतुदी, गृहनिर्माण संस्थांना, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील :—

कलम १, कलम २ चे खंड (५), (६), (७), (८), (१०), (१०अ एक), (१०अ दोन), (१०अ तीन), (१३), (१४), (१६), (१७), (१८), (२०अ), (२१), (२४), (२६), (२७), (२८), (२९), (२९-अ) आणि (३१), कलमे ३, ३अ, ४, ५, ७, ९, १०, १२, १३, १४, १५, १७, १८, १९, २०, २०अ, २१, २१अ, २२, कलम २३ ची पोट-कलमे (१), (२) आणि (३), कलमे २५, २५अ, ३१, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ४०, ४१, ४२, कलम ४३ चे पोट-कलम (१) चे परंतुक वगळून, कलम ४५ आणि कलम ४७ ची पोट-कलमे (१) (ब), (२) आणि (३), कलम ५०, कलम ६२ चे खंड (अ), (क), (ड) व (इ), कलमे ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७१-अ, ७२, ७३, कलम ७३ एक-ड ची पोट-कलमे (२) ते (७), कलमे ७३ क, ७३-कब, ७३ कक, ७३फ, ७३ आय, ७५, ७६, ७७, ७७अ, ७८अ, कलम ७९ ची पोट-कलमे (१), (१अ), (१ब), (२), (३) व (४), कलमे ७९अ, ७९अअ, ८०, ८१ ते ८९अ, ९१ ते १००, १०२ ते ११०, १४५ ते १४८ अ, १४९ ते १५४, १५४-अ आणि १५५ ते १६८.

(२) या अधिनियमाच्या पुढील तरतुदी गृहनिर्माण संस्थांना लागू होणार नाहीत :—

कलम २ चे खंड (१) (अ) व (ब), (२) (अ), (ब) व (क), (४), (९), (१० अ दोन-एक), (१० अ), (११), (११अ), (१२), (१४ अ), (१५), (१६अ), (१९) (अ), (अ-१), (ब) व (क), (१९अ), (२२), (२३) आणि (२५), कलमे ६, ८, ११, १६, १८अ, १८ब, १८क, २३(४), २४, २४ अ, २६, २७, २८, २९, ३०, ३२, ३२अ, ३९, ४४, ४४अ, ४६, ४७(१)(अ), ४७(४), ४८, ४८अ, ४९, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२(ब), ६३, ६९ब, ७२अ, ७३ (१अ) (ब), ७३अ, ७३ अअअ, ७३-ब, ७३ कअ, ७३ ड, कलम ७३ एक-ड चे पोट-कलम (१), कलमे ७४, ७८, ९०, १०१, ११०-अ आणि कलमे १११ ते १४४-१अ.

**१५४ब-१** ते **१५४ब-३१** ** ** **

**१५५** ते **१५६** ** ** **

अधिनियमाच्या तरतुदींपासून संस्थांना सूट देण्याचा अधिकार.

**१५७.** राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतदीपासून सूट देता येईल किंवा अशा तरतुदी, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा अधिनियमांच्या किंवा नियमांच्या आशयास बाध येणार नाही अशा फेरफारानिशी अशा संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास लागू होतील, असा निदेश देता येईल :

परंतु, कोणत्याही संस्थेस बाधक ठरेल, असा कोणताही आदेश, अशा संस्थेस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावाचून काढण्यात येणार नाही.

" परंतु आणखी असे की, राज्य शासनाला, या अधिनियमाची कलमे २६, ७३अ, ७३ अअअ, ७३ब, ७३क, ७३कअ , ७३कब, ७३इ, ७५, ७६, ७८, ७८अ आणि ८१ यांपासून कोणत्याही संस्थेला किंवा संस्थांच्या वर्गाला सूट देता येणार नाही.".

**१५८. ते १६८.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९.]**

**[महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०
यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.